# विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय नियमावली:-

1) ग्रंथालयात प्रवेश करतांना विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र असणे अनिवार्य आहे. ओळखपत्र सोबत असल्याशिवाय विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून पुस्तके तसेच नोडूज मिळणार नाही.

2) एका विद्यार्थ्यास एका वेळी अभ्यासक्रमाची दोन पुस्तके सात दिवसांसाठी मिळतील.

3) अभ्यासक्रमाची पुस्तके दर सात दिवसांनी बदलून/नुतनीकरण करून घ्यावीत, अन्यथा प्रत्येक पुस्तकास प्रतिदिन एक रुपयाप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
4) ग्रंथालयातील सेवा बद्दल काही तक्रार असेल तर ग्रंथपाल यांना लेखी द्यावे. ग्रंथपाल रजेवर असल्यास ग्रंथालय परिचर यांच्याकडे द्यावे. किंवा तक्रार बॉक्समध्ये तक्रार टाकावी.

5) पुस्तक गहाळ झाल्यास किंवा खराब झाल्यास त्या पुस्तकाची प्रचलित किंमत व दंड भरावा लागेल.

6) नोडूज च्या वेळेस सर्व पुस्तके विद्यार्थ्यांना परत करावी लागतील. परीक्षेच्या कालावधीत पुस्तके स्वतः जवळ ठेवायची असतील तर ठरवून दिलेली अनामत रक्कम भरावी लागेल. पुस्तके परत केल्यानंतर अनामत रक्कम परत केली जाईल.

7) अवांतर वाचनाची पुस्तके हवी असल्यास फॉर्म भरून वाचन कक्षात द्यावा.
8) अवांतर वाचनाची पुस्तके सात दिवसांत परत करणे अनिवार्य आहे.